Civil Services (Main) Examination- 2025

SLPM–D–MRTH

मराठी (प्रश्न-पत्र–II)

(साहित्य)

वेळ : तीन तास	कमाल अंक : 250

प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात

आठ प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, त्याचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्नांच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावेत. प्रश्न सोडवत असताना उत्तरातील काही भाग लिहिण्याचा राहिल्यास किंवा उत्तरपत्रिकेतील एखादे पान कोरे सोडल्यास तेथे काट मारावी.

MARATHI (PAPER—II)

(LITERATURE)

Time Allowed : Three Hours	Maximum Marks : 250

QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

Please read each of the following instructions carefully before attempting questions

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

Optional Province · optionalprovince.com

Civil Services (Main)
Examination- 2025

SECTION—A

1. पुढील **पाच** उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a) पंडितां : केशवद्या : सर्वांगी काई देखणें असे : देखणें ते डोळेनिचि कीं : तैसे तुम्ही माझे डोळे कीं गा पंडिता : केशवद्या :

(b) तुम्हांला विद्या शिकून कारकुनांच्या जागा न मिळाल्यास आम्हासारखी पंचांगे हाती घेऊन घरोघर भिक्षा का मागावयाच्या आहेत?

(c) तुम्ही औदार्यामुळे लग्न केलें की, कीर्तीच्या लोभासाठी लग्न केलें हे आज कोण पहावयांस आले आहे? आणि तुमच्यां हेतूंच्या उच्चतेवर तुमच्या मुलांची पदवी ठरते काय?

(d) माय गॉड ! अगं, विचारते आहेस काय? उठून ये आधी भाऊला लिहिलं नाहीस ना आजारी आहेस म्हणून? काळजी करायचा तो. तसा बेफिकीर वाटला तरी तुझ्यावर माया आहे हो.

(e) माझा मनाला जरा टैलत चालल्यासारखं वाटलं... ती अशी पहिलीच टोचणारी चप्पल, ती होती दोन रूपयांची. मग मला वाटायचे, दोन रूपयांच्या चप्पलने टोचण्याशिवाय करावे तरी काय?

2. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) '' 'स्मृतिस्थळ' हे स्मरणरूप चरित्र आहे'' या विधानाची चर्चा करा. 15

(b) सत्यनिष्ठा व नीतिमत्ता या मूल्यांना प्राधान्य देत सामाजिक चारित्र्याची उभारणी म. फुले यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' मधून कशी केली आहे, ते स्पष्ट करा. 15

(c) '' 'ब्राह्मणकन्या' या कादंबरीतल्या गौण पात्रांनी कथानकाला उठाव आणला आहे'', या विधानाची सत्यता पटवा. 20

3. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) '' 'स्वभाव रेखन आणि विनोद-प्रचुर संवाद' हेच 'साष्टांग नमस्कार' या नाटकाचे खरे बळ आहे'' या विधानाची चर्चा करा. 15

(b) 'शिळान' या कथासंग्रहाच्या आधारे उद्धव शेळके यांच्या भाषाशैलीचे वेगळेपण विशद करा. 15

(c) 'परखड सहानुभूतीपूर्ण जीवनदर्शनामुळे बाबुराव बागूल यांची कथा दलितत्वाच्या मर्यादा ओलांडून जाते,' 'जेव्हा मी जात चोरली होती'च्या आधारे स्पष्ट करा. 20

4. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या 'जन हे वोळतु जेथे' या कादंबरीचे समकालिन मराठी कादंबरीपेक्षा वेगळेपण कोणते? ते विशद करा. 15

(b) एका निरागस लाघवी पण जिद्दी मुलाच्या भावना प्र. ई. सोनकांबळे यांच्या 'आठवणींचे पक्षी' मधून सहजपणे व्यक्त झाल्या आहेत. हे विधान स्पष्ट करा. 15

(c) स्त्रीच्या जीवनात काळानुरूप होणारी स्थित्यंतरे आणि बदलत जाणारे संदर्भ याचे प्रत्यंतर 'एकेक पान गळावया' या कादंबरीतून कसे येत रहाते. ते सविस्तर वर्णन करा. 20

Optional Province · optionalprovince.com

SECTION—B

5. पुढील **पाच** उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a) श्रीरंग गोपिकोत्संग धरुनि करि रंग हरी हा बाई।
कुंजांत मातला वसंत सांगु मी काई॥

(b) प्रकट तिजपुढारी जाहला राजमौळी।
पदर परि न घेतां हार तैसा झळाळी॥
निज हृदयनिवासी काय बाहेरि आला।
निरखुनि दमयंती तेंवि मानी तयाला॥

(c) मरणोत्तर वाटे होइल आशापूर्ती
स्वर्गीय मंदिरे घ्यायाला विश्रांती
लाभेल प्रभूची वा प्रमदांची प्रीती
त्या मतीस व्याकुळ इथेच अंतिम शांती
मातीवर चढणे एक नवा थर अंती!

(d) सर्व काही नाकारून माझे शब्द केव्हाच निघालेत
अजून तुझी आवराआवर झाली का नाही?
ह्या एकोणीस ठिगळांचा आता कशाला विचार?
अजून तुझी फूले माळून झालीत का नाही?

(e) कोठुनि येते मला कळेना
उदासीनता ही हृदयाला।
काय बोचते ते समजेना
हृदयाच्या अंतर्हृदयाला।

6. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) नामदेवांच्या उपदेशवाणीचे सार तुम्ही अभ्यासलेल्या अभंगांच्या आधारे थोडक्यात लिहा. 15

(b) 'मराठमोळ्या स्त्रीचे सौंदर्य व तिच्या साजशृंगाराचे ढंगदार वर्णन हे लावणीचे महत्वाचे वैशिष्ठ्य होय,' पैंजण संग्रहाच्या आधारे साधक-बाधक चर्चा करा. 15

(c) 'भावनोत्कटतेपेक्षा कल्पनाविलासात रघुनाथ पंडित अधिक रमतो,' 'दमयंती-स्वयंवरा'च्या आधारे या विधानाचा परामर्श घ्या. 20

7. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) बालकवींच्या कवितेतून निसर्गाचे विविध विभ्रम कसे साकार झालेले आहेत ते सोदाहरण वर्णन करा. 15

(b) 'विशाखा' मध्ये स्वातंत्र्याकांक्षी समुहाची भावना व्यक्त करणारी कविता प्रामुख्याने आहे, चर्चा करा. 15

(c) नारायण सुर्वे यांनी सूर्ययुगाची सुरूवात करून आधुनिक मराठी कवितेला कोणती वैशिष्ट्यपूर्ण देणगी दिली? 'जाहिरनामा' मधील कवितांच्या आधारे स्पष्ट करा. 20

Optional Province · optionalprovince.com

8. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'नाविन्य आणि लावण्य यांच्या सुंदर मिलाफमुळेच कवी ग्रेस यांची कविता रसिकांना आनंद देते' या विधानाची यथार्थता 'संध्याकाळच्या कविता' संग्रहा आधारे पटवा. 15

(b) 'या सत्तेत जीव रमत नाही' या संग्रहातील कविता दलितांच्या जाणिवा आणि दुःख यांना एक नवा आकार देते, कसे ते सांगा. 15

(c) वि. दा. करंदीकर यांची कविता प्रगाढ वैचारिकता प्रगट करते त्यासोबतच नाजूक भावसौंदर्याचाही प्रत्यय देते, हे विधान 'मृदगंध'च्या आधारे स्पष्ट करा. 20

★ ★ ★

Optional Province · optionalprovince.com